निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

CNR-MHSN14000463-2022

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादींचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. **वादींचे थोडक्यात कथन असे की,**

प्रस्तुत अर्ज कलम १अ मध्ये नमूद केलेली मिळकत सि.स.नं. ८५१ ही मुळची महाराष्ट्र शासनाची खुली जागा होती. सदर मिळकतीपैकी वादी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरविंद आबा पवार यांनी वादी संस्थेचे एकत्रीत इमारत बांधणेकरिता दावा अ मिळकतीपैकी जागेची जिल्हाधिकारी सांगली यांचेकडून दि. ०१/०७/१९९६ रोजी मागणी केली. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी सांगली यांनी सहा. संचालक नगररचना सांगली व तहसिलदार शिराळा यांचेमार्फत योग्य ती चौकशी व त्यांचेकडील मोजणी व इतर अहवाल पाहून दावा ब मिळकत क्षेत्र म्हणजेच दावा अ मिळकतीमधील उत्तर बाजूने अ, ब, क, ड याप्रमाणे नमूद असणारे ४५० चौ.मी. क्षेत्र वादी संस्थेकरिता देणेचा आदेश म ह–२/ न.भू./एस.आर–१०४/२००६ दि. २२/०५/२००६ रोजी केला. सदर आदेशाप्रमाणे दावा अ मिळकतीचे रेकॉर्ड सदरी दि. २३/०६/२००८ रोजी वादी संस्थेच्या नावाची नोंद देखील झालेली आहे. त्यानंतर दावा ब मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मोजून मापून वादीस दिला असून त्याप्रमाणे दावा मिळकत वादींचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस होती व आहे.

३. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी संस्थेकडे सुसज्ज इमारत बांधकामाकरिता पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने वादी यांनी दावा ब मिळकतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपाचे पत्र्याचे शेड उभा करुन वादी यांचे संस्थेची खते, जनावरांची पेंड खाद्य, तसेच शेळी, मेंढी पालनाचा खुला गोठा केलेला होता व त्याप्रमाणे वादींचा त्यामध्ये प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट होती. प्रतिवादी हे दावा ब मिळकतीत वादींचे असणारे कब्जा व वहिवाटीबाबत तसेच प्रतिवादी व वादींचे असणारे हद्दीबाबत विनाकारण वाद करीत होते व आहेत. तसेच सन २०१९ च्या सुमारास दावा ब मिळकतीमध्ये मोरणा नदीस आलेल्या महापुरामुळे पाणी आलेने वादी यांनी दावा ब मिळकतीमधील संस्थेचे साहीत्य अन्य ठिकाणी स्थलांतरीत केलेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हे दावा मिळकतीतील वादींचे असणारे कब्जा व वहिवाटीस हरकत व अडथळा करुन विनाकारण वाद करु लागले आहेत.

४. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी दावा ब मिळकतीची मोजणी होवून मिळणेकरिता मे. तहसिलदारसाो शिराळा यांचेकडे दि. २०/०१/२०२० रोजी अर्ज दाखल केलेला होता. त्याप्रमाणे सदरचे प्रकरण उपअधिक्षक भूमी अभिलेख, शिराळा यांचेकडे पाठविले व त्यांनी मोजणी कामी र.रु. ३०००/– फी भरुन घेवून मोजणीची तारीख नोटीसीद्वारे कळविली. दि. १०/११/२०२० रोजी मोजणी कामी मोजणीदार आले असता प्रतिवादी यांनी दावा ब मिळकतीची मोजणी करुन दिलेली नव्हती तसेच दावा मिळकतीचे मोजणीस मज्ञाव केलेने यातील वादीतर्फे शिराळा पोलीस स्टेशनला अदखलपात्र

गु.र.नं. ६४८/२०२० चा दाखल केलेला होता. त्यानंतर वादी यांनी दावा मिळकतीचे मोजणीबाबत वेळोवेळी पाठपुरावा केला, परंतू उपअधिक्षक भूमी अभिलेख शिराळा यांचेमार्फत दावा मिळकतीचे मोजणीबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

५ वादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी दि. १८/०७/२०२२ रोजी दावा मिळकतीबाबत मे. जिल्हाधिकारीसाो. सांगली यांचेकडे वादीचे दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करणेच्या उद्देशाने दावा अ मिळकतीमधील वादी संस्थेस मिळालेल्या क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्राबाबत वाद उपस्थित करणेच्या उद्देशाने वादी संस्थेस मिळालेल्या जागेचा मंजुरी आदेश रद्द होणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. परंतू प्रतिवादी यांचा दावा ब मिळकतीचे मालकी हक्काशी कोणताही संबंध नसल्याने प्रतिवादी यांना तसा अर्ज देणेचा कायदेशीर हक्क नव्हता व नाही. दिनांक १०/११/२०२० रोजी दावा ब मिळकतीचे मोजणीस प्रतिवादींनी हरकत व अडथळा निर्माण केलेला आहे व दरम्यानच्या काळात वेळोवेळी वादीचे दावा ब मिळकतीमधील कब्जे व वहिवाटीस हरकत व अडथळा करणेच्या उद्देशाने मे. जिल्हाधिकारीसाो. सांगली यांचेकडे तसेच अन्य शासकीय कार्यालयात खोटे अर्ज करुन वादीस दावा ब मिळकतीमधून आऊस्ट करणेचा प्रयत्न करीत आहेत. तशी भाषा देखील प्रतिवादींनी बोलून दाखविली आहे व सदरचे कृत्य हे बेकायदेशीर व दांडगाव्याचे आहे. प्रतिवादीचे सदरचे कृत्यास वेळीच कायद्याने पायबंद करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादींनी प्रतिवादी यांनी स्वत: अगर इतरामार्फत वादीचे दावा ब

मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करु नये व वादीस दावा मिळकतीतून आऊस्ट करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी नि.क्र.१८ वर त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असून तो त्यांना मान्य व कबूल नाही. दावा मिळकतीचे वर्णन अपुरे, चुकीचे, संदिग्ध असल्याने व मिळकतीच्या चतु:सिमा देखील चुकीच्या असल्याने त्या त्यांना मान्य व कबूल नाहीत. तसेच वादीने प्रत्यक्ष वस्तुस्थितीपेक्षा पूर्णत: विसंगत अशा चतु:सिमा नमूद केलेल्या आहेत. वादीने सदरचा दावा शिवतेज सह. दुग्ध उत्पादन संस्था, वारणा मोरणा ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था व शिवभवानी सह. शेळी–मेंढी पालन उत्पादन संस्था मर्या. मांगले या संस्थांकरता दाखल केल्याचे दिसून येते. परंतू सदर तिन्ही संस्थेतर्फे अधिकृत इसम म्हणून अभिनय अरविंद पवार यांना दावा दाखल करणेचा हक्क व अधिकार दिले असलेबाबत वादीने दाव्यामध्ये कोठेही कथन केलेले नाही अगर त्याबाबत कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे त्यांना दावा दाखल करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नसल्याचे दिसून येते.

७. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने दाव्यासोबत दाखल केलेल्या मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील दिनांक २२/०५/२००६ रोजीचे आदेशाचे अवलोकन केले असता सदर आदेश मिळणेबाबत तथाकथित अरविंद आबा पवार संस्थापक वादी नं. १ ते ३ संस्था

यांनी निव्वळ महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे मांगले, ता. शिराळा येथील सि.स.नं. ८५१ या मिळकतीचे काही क्षेत्र हडप करण्याच्या हेतूने सदर मिळकतीबाबतची खोटी व बनावट कागदपत्रे बनवून तसेच तथाकथित नगर भूमापन कार्यालयातील अधिका–यांशी संगनमत करुन सि.स.नं. ८५१ बाबत नकाशा व उतारा यामध्ये फेरफार करुन जिल्हाधिकारी यांचकडे सादर केल्याचे दिसून येते. मा. जिल्हाधिकारी सांगली यांनी दिनांक २२/५/२००६ रोजीच्या आदेशानुसार सदर आदेशामध्ये अटी नं. १ ते १८ नमूद करुन सदरचा आदेश वादी नं. १ ते ३ तर्फे तथाकथित संस्थापक चेअरमन अरविंद आबा पवार यांना पारित केल्याचे दिसून येते. सदर अटींचे अवलोकन केले असता अट नं. ९ "उक्त जागा मंजूर केल्यापासून दोन वर्षांचे आत त्यावरील कार्यालयीन इमारतीचे बांधकाम केले पाहिजे यात कसूर झालेस कब्जेहक्काच्या रकमेइतकी नुकसान भरपाईची रक्कम वसूल करुन जागा सरकार जमा करणेत येईल" अशी आहे. तसेच अट नं. १८ "वरीलपैकी कोणत्याही अटींचा भंग झालेस प्रस्तुतचा जागा मंजुरीचा आदेश रद्द करणेत येईल" असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

८. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादाकरिता वादीने दाव्यासोबत जोडलेल्या सदर आदेशानुसार दावा मिळकत सि.स.नं. ८५१ मधील ४५० चौ.मी. या जागेबाबत दिनांक २२/०५/२००६ रोजी सदरचा आदेश झालेला आहे असे मानले तरी देखील सदर आदेशामधील अट नं. ९ नुसार वादी नं. १ ते ३ या संस्थेमार्फत आजअखेर सि.स.नं. ८५१ मधील ४५० चौ.मी. या अगर कोणत्याही क्षेत्रामध्ये वादी नं. १ ते ३ यांच्या कार्यालयीन इमारतीचे

कोणत्याही पक्क्या अगर कच्च्या स्वरुपाचे बांधकाम वादी नं. १ ते ३ यांचेतर्फे कधीही करण्यात आलेले नव्हते व नाही. यावरुन वादीने जिल्हाधिकारी सांगली यांचे आदेशामधील अटींचे उल्लंघन केल्याचे दिसून येते. तसेच आदेशामधील अट नं. १८ नुसार वादी नं. १ ते ३ या संस्थेन दावा मिळकतीबाबत मिळवलेला जागा मंजुरीचा आदेश देखील रद्द झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. याच कायदेशीर कारणास्तव वादी यांना दावा मिळकत सि.स.नं. ८५१ बाबत मालकी अगर जागा वापराबाबत देखील कोणताही कायदेशीर हकक व अधिकार नसल्याचे व त्यामुळेच सदर मिळकतीबाबत दावा दाखल करणेचा देखील हक्क व अधिकार नसल्याचे दिसून येते.

९. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, मौजे मांगले येथील सि.स.नं. ८५१ क्षेत्र १४४३.४ चौ.मी. असून त्याची आजपावेतो कोणत्याही प्रकारची फाळणी होवून स्वतंत्र वसले पडलेले नसल्यामुळे त्यातील स्वतंत्र क्षेत्र ४५० चौ.मी. हे वादीला प्रत्यक्ष जागेवरती कधीही मिळालेले नव्हते व नाही. वादीने दाव्यासोबत दाखल केलेला दावा ब नकाशा हा पूर्णत: चुकीचा व पोकळ स्वरुपाचा असून केवळ दाव्याच्या साधावणुकीकरिता दाखल केलेला आहे. त्याप्रमाणे आजपावेतो दावा ब मिळकतीचा नकाशा भूमी अभिलेख कार्यालय शिराळा यांचेकडे सि.स.नं. ८५१ मधून फाळणी होवून स्वतंत्र कधीही तयार झालेला नव्हता व नाही.

१०. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, सि.स.नं. ८४९ ही

प्रतिवादी नं. १ ते४ यांची वडीलार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीचा भूमापन क्र. १/५/अ असा असून त्याचे क्षेत्र हे ०–१४ आर इतके आहे. वस्तुत: सदर मिळकतीपासून पूर्वेकडील शिराळा–मांगले या मुख्य रस्त्यापर्यंत असणा–या खुल्या जागेमध्ये फार पूर्वीपासून सदर प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे मालकी वहिवाटीचे दगड चिरा सिमेंटचे पत्रोशी घर, बांधकामाचे साहित्य ठेवण्याचे पत्रोशी शेड, गिरीजा ट्रेडर्स या नावे बांधकाम साहित्य विक्रीचे पूर्वाभिमूखी पत्रोशी शेड असे कायमस्वरुपी रस्त्यालगत बांधकाम आहे. परंतू वादीने जागेवरील वरील नमूद प्रत्यक्ष वस्तुस्थिती दाव्यामध्ये कोठेही नमूद केलेली नाही.

११. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं. १ यांनी दिनांक १८/०७/२०२२ रोजी मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे रीतसर तक्रारी अर्ज देवून वादी नं. १ ते ३ या संस्थांना सि.स.नं. ८५१ बाबत मिळालेला जागा मंजुरी आदेश रद्द होणेकरिता रितसर तक्रारी अर्ज दिलेला आहे. तसेच प्रतिवादी यांनी सि.स.नं. ८५१ या दावा मिळकतीबाबत वादी नं. १ ते ३ या संस्थांनी यापूर्वी केलेल्या तथाकथित खोट्या व बनावट कागदपत्रांबाबत व मिळवलेल्या आदेशांबाबत माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देवून वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये कागदपत्रांची मागणी देखील केलेली आहे. प्रतिवादी यांनी केलेल्या तक्रारी नुसार मा. तहसिलदारसो. शिराळा यांनीदेखील सि.स.नं. ८५१ मधील वादी संस्थेने मिळविलेल्या जागा मंजुरी आदेशाबाबत रितसर चौकशी सुरु केली व त्याबाबत चौकशी नोटीसा वादी संस्थेला गेल्यानंतर त्याचा

राग मनात धरुन खोटा दावा व तुर्तातुर्त अर्ज प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे.

१२. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने दाव्यामध्ये नमूद केलेल्या दावा मिळकत सि.स.नं. ८५१ बाबत वादीस मिळालेल्या कोणत्याही जागा मंजुरीच्या आदेशाप्रमाणे सि.स.नं. ८५१ मधील कोणत्याही हिश्याची मिळकत वादी नं. १ ते ३ या संस्थांनी कायदेशीररित्या कधीही कब्जेवहिवाटीत घेतलेली नव्हती व नाही. याउलट दावा मिळकतीबाबत मिळालेल्या आदेशांमधील अटी व शर्तींचे वादी संस्थांकडूनच कायदेशीररित्या भंग झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सि.स.नं. ८५१ या मिळकतीच्या मालकी, वहिवाट अगर वापराबाबत कोणताही आदेश दिवाणी कोर्टाकडून मिळविण्यास वादी नं. १ ते ३ पात्र नसून त्याबाबत हद्द निश्चीती अगर निरंतर ताकिदी सारखी दाद मागण्यास देखील वादी नं. १ ते ३ हे पात्र नसल्याचे दिसून येते. वादी नं. १ ते ३ यांना सकृतदर्शनीच सि.स.नं. ८५१ बाबत मे. कोर्टामध्ये दावा अगर ताकीद अर्ज दाखल करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार कधीही नव्हता व नाही.

१३. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादीला दावा मिळकतीबाबत कोणतेही मालकी, वहिवाट अगर वापराबाबत कायदेशीर हक्क व अधिकार मुलत: प्राप्त होत नसल्यामुळे वादीस सकृतदर्शनी अजिबात केस नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तसेच सदर दाव्याचा व तुर्तातुर्त ताकीद अर्जाचा तौलनिक कल देखील वादीचे बाजूने नसल्याचे देखील दिसून येते. मुळातच दावा

मिळकतीबाबत मालकी हक्क व वहिवाटीबाबत वादीने दाव्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दावा मिळकतीमधील वादीची मालकी संदिग्ध असल्याने वादीचे कोणतेही नुकसान होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वरील सर्व कायदेशीर कारणांचा विचार करता वादींचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज सत्वर फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

१४. वादींतर्फे विधीज्ञ श्री.ए.बी.आलुगडे व प्रतिवादी नं. १ ते ४ तर्फे विधीज्ञ श्री.एच.एस.सुरले यांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद केला.

१५. अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व वादीतर्फे युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविण्यात येतात.

अ.नं.	मुद्दे		निष्कर्ष
१.	वादींच्या लाभात प्रथमदर्शनी केस असल्याचे वादी सिध्द करतात का ?		होकारार्थी.
२.	दाव्याचा समतोल वादींच्या लाभात आहे का ?		होकारार्थी.
३.	वादींच्या लाभात तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल का ?		होकारार्थी.
४.	कोणता आदेश ?		अंतिम आदेशाप्रमाणे

१६. वादींनी नि.क्र. ३ सोबत मांगले येथील सि.स.नं. ८५१ चे दोन उतारे व नकाशाचे छायांकीत प्रती, तसेच मोजणीचा नकाशाची छायांकीत प्रत, वादी नं. ३ ने माहितीचे अधिकाराखाली दिलेला अर्ज व त्यावरील आदेश, वादींनी तहसिलदार शिराळा यांचेकडे दिलेल्या अर्जाची छायांकीत प्रत, उपअधिक्षक भूमीअभिलेख शिराळा यांनी वादीस मोजणीबाबत फी भरणेचे दिलेले आदेशाची छायांकीत प्रत, मे. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे प्रतिवादीने दिलेला अर्जाची छायांकीत प्रत, उपअधिक्षक भूमी अभिलेख यांनी दिलेली मोजणीची नोटीसीची छायांकीत प्रत, वादी अभिनय पवार यांनी माहिती अधिकाराखाली दिलेला अर्जाची प्रत, प्रतिवादीविरुध्द गुन्हा दाखल केल्याची एन.सी. नं. ६४८/२०२० ची छायांकीत प्रत, तहसिलदारसाो. शिराळा यांचेकडे वादींनी दिलेला अर्जाची छायांकीत प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच नि.क्र. ३० सोबत वादी नं. १, २ व ३ संस्थेंच्या ठरावाच्या तीन मुळ प्रती, मौजे मांगले येथील फेरफार नं. ३१६१७ ची डिजीटल प्रत, सन २०१९ मधील पुराचे दोन फोटो ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१७. प्रतिवादींनी नि.क्र. २७ सोबत चार फोटो, फोटोचे बिलाची पावती, तहसिलदार शिराळा यांनी पाठविलेल्या नोटीसीची छायांकीत प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

कारणमिमांसा

मुद्दा नं.१ ते ४ करीता :-

१८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे कोणत्या

परिस्थीतीत तुर्तातुर्त ताकिद देता येईल याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. न्यायालयाच्या समोर एखाद्या दाव्यामध्ये शपथेवर एखादे कथन सिध्द करुन अथवा अन्य मार्गाने जर दावा मिळकत ही नुकसान, नाश अथवा हस्तांतरित करण्याच्या विचारात दाव्यातील संबंधित पक्षकार असतील अथवा संबंधित मिळकत ही बेकायदेशीररित्या एखाद्या दरखास्तीच्या मागणीमध्ये विक्री होत असेल, प्रतिवादी हे दावा मिळकत त्या जागेवरुन हालवायचा प्रयत्न करत असतील अथवा नाश करण्याचा प्रयत्न करत असतील, प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रयत्न करत असतील किंवा त्या अनुषंगाने वादीला नुकसान होईल असे कृत्य करत असतील तर न्यायालयाला सदरचे कृत्य थांबवण्याच्या उद्देशाने तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करण्याचे ऐच्छीक अधिकार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दिलेले आहेत. परंतु सदरचे अधिकार वापरताना न्यायालयाने वादी व प्रतिवादी यांची कथने व पुरावा याचा विचार करुन वस्तुस्थिती संदर्भात न्याय देण्यासाठी ऐच्छीक अधिकाराचा वापर करणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जावर आदेश होण्यापुर्वी प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व कधीही भरुन न येणारे नुकसान या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

१९. प्रस्तुतचा दावा वादी नं. १ ते ३ संस्थेकरिता अधिकृत इसम श्री. अभिनय अरविंद पवार यांनी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी अभिनय पवार यांना दावा दाखल करणेकरिता कोणतेही कायदेशीर हक्क व अधिकार नसल्याबाबत कथन केले आहे. मात्र वादीतर्फे नि.क्र. ३० सोबत वादी नं. १ ते ३ संस्थेच्या

ठरावाच्या मुळ प्रती दाखल करण्यात आलेल्या असून सदर प्रतींवरुन ते ठराव दिनांक ११/०४/२०२३ व १२/०४/२०२३ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. वादींनी दिनांक २५/०५/२०२३ रोजी दावा दाखल केलेला असल्यामुळे वादी नं. १ ते ३ संस्थेकरिता अभिनय पवार यांना सदर ठरावानुसार दावा दाखल करण्याचे अधिकार व हक्क असल्याचे दिसून येते.

२०. वादींनी दावा अ मिळकत सि.स.नं. ८५१ ही मुळची महाराष्ट्र शासनाची खुली जागा असल्याचे तसेच वादी संस्थेच्या मागणीनुसार जिल्हाधिकारीसाो यांचे आदेशानुसार दावा ब मिळकत म्हणजेच सि.स.नं. ८५१ मधील ४५० चौ.मी. क्षेत्र वादी संस्थेस देणेचा आदेश दिनांक २२/०५/२००६ रोजी झाल्याचे व त्या अनुषंगाने मिळकतीचे रेकॉर्डसदरी दि. २३/०६/२००८ रोजी वादी संस्थेच्या नावाची नोंद झाल्याचे व त्याच वेळी सदर मिळकत क्षेत्राचा प्रत्यक्ष कब्जा मोजून मापून त्यांना देण्यात आल्याचे कथन केले आहे. वादीतर्फे नि.क्र. ३ सोबत दाखल केलेले सि.स.नं. ८५१ चे उतारे वरुन सि.स.नं. ८५१ ही महाराष्ट्र शासनाची मिळकत असल्योच व त्यामधील ४५० चौ.मी. क्षेत्र वादी संस्थेच्या मालकीचे असल्याचे स्पष्ट होते. सि.स.नं. ८५१ ची फाळणी होवून स्वतंत्र वसले पडले नाहीत. त्यामुळे त्यातील स्वतंत्र क्षेत्र ४५० चौ.मी. हे वादीला प्रत्यक्ष जागेवरती कधीही मिळाले नव्हते असे प्रतिवादीनी कथन केले आहे. याउलट वादीनी दाखल केलेल्या जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार नगर रचना विभागाने नकाशात हिरव्या रंगाने अ, ब, क, ड अक्षरानी दर्शवलेली जागा वादी संस्थाचे कार्यालय एकाच इमारतीत बांधण्यासाठी देण्यात आल्याचे स्पष्ट होते.

वादीनी नगर रचनाकार यांनी दिलेला नकाशा देखील दाखल केलेला आहे. त्यामध्ये सि.स.नं. ८५१ मध्ये अ, ब, क, ड हे स्वतंत्र क्षेत्र दर्शविलेचे दिसते तसेच त्या अनुषंगाने झालेला फेरफार नंबर ३१६१७ देखील वादीनी कागद यादी नि. ३० सोबत दाखल केलेला आहे.

२१. वादींनी त्यांच्या संस्थेकडे इमारत बांधकामाकरिता पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे दावा ब मिळकतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपाचे शेड उभे करुन कब्जे वहिवाट चालू केल्याचे व प्रतिवादी यांनी त्यांचे कब्जे वहिवाटीस हद्दीवरुन वाद घालण्यास सुरवात केल्याचे कथन केले आहे. वादींनी सन २०१९ च्या सुमारास मोरणा नदीस आलेल्या महापूरामुळे दावा ब मिळकतीमधील साहित्य स्थलांतरीत केल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादींनी त्यांना हरकत अडथळा केल्याचे कथन केले आहे. वादींनी सन २०१९ पूर्वी दावा मिळकत ब मध्ये शेड उभे केल्याबाबतचा कोणताही पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही. मात्र नि.क्र. ३० सोबत मोरणा नदीला आलेल्या महापुराच्या अनुषंगाने फोटो दाखल केलेले आहेत.

२२. सि.स.नं. ८५१ च्या पश्चिमेस प्रतिवादींचा सि.स.नं. ८४९ आहे. प्रतिवादीनी त्यांचे सि.स.नं. ८४९ या मिळकतीपासून पूर्वेकडील शिराळा–मांगले या मुख्य रस्त्यापर्यंत असणा–या खुल्या जागेमध्ये फार पूर्वीपासून त्यांचे मालकी वहिवाटीचे दगड चिरा सिमेंटचे पत्रोशी घर, बांधकामाचे साहित्य ठेवण्याचे पत्रोशी शेड, गिरीजा ट्रेडर्स या नावे बांधकाम साहित्य विक्रीचे पूर्वाभिमूखी पत्रोशी शेड असे

कायमस्वरुपी रस्त्यालगत बांधकाम असल्याचे कथन केले आहे. मात्र त्यांनी त्या अनुषंगाने कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. सि.स.नं. ८५१ मध्ये प्रतिवादींचा हक्क हित संबंध दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा समोर आलेला नाही. प्रतिवादींनी त्यांचे कथनापृष्टर्थ कागद यादी नि. २७ सोबत चार फोटो दाखल केलेले आहेत. परंतू सदरचे फोटो हे दावा मिळकतीतीलच असल्याबाबत कोणताही पूरावा समोर आलेला नाही. त्यामुळे केवळ सदर फोटोवरुन प्रतिवादींची दावा मिळकतीत कब्जे वहिवाट आहे असे म्हणता येणार नाही. प्रतिवादींनी जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे दि. १८/०७/२०२२ रोजी दिलेल्या अर्जामध्ये सि.स.नं. ८५१ मध्ये गेली १०० वर्ष पेक्षाही अधिक त्यांची वहिवाट चालू असल्याचे कथन केले आहे. मात्र सदरची बाब त्यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये नमुद केलेली नाही अथवा त्या अनुषगांने त्यांनी कोणताही पूरावा दिलेला नाही. सि.स.नं. ८५१ मिळकतीमधील क्षेत्र हडप करण्याच्या हेतूने वादींनी खोटी व बनावट कागदपत्रे बनवून नगरभूमापन कार्यालयातील अधिका–यांशी संगनमत करुन उतारे व नकाशात फेरफार करुन जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केल्याचे प्रतिवादींनी कथन केले आहे. मात्र सदर कथनाच्या पृष्टयर्थ कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

२३. वादींचे कथनानुसार सन २०१९ चे महापुरामुळे वादीनी दावा ब मिळकतीतील त्यांचे साहित्य अन्य ठिकाणी स्थलांतरीत केले याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी वादींचे वहिवाटीस जास्तच हरकत अडथळा करु लागले म्हणून त्यांनी दावा मिळकत ब ची मोजणी होवून मिळणेकरिता तहसिलदार शिराळा

यांचेकडे अर्ज केला. सदर अर्जानुसार उपअधिक्षक भूमीअभिलेख यांनी वादींकडून मोजणी फी र.रु. ३०००/– भरुन घेवून दिनांक १०/११/२०२० रोजी मोजणीचे काम होणार असल्याचे नोटीसीने कळविल्याबाबत कथन केले आहे. वादींनी नि.क्र. ३ सोबत तहसिलदार यांना दिलेले पत्र, उपअधिक्षक भूमीअभिलेख यांनी वादींस मोजणी फी भरण्याबाबतचे दिलेले पत्रांवरुन तसेच मोजणी नोटीस प्रतीवरुन वादींच्या उपरोक्त कथनास दुजोरा मिळत आहे. वादीतर्फे प्रतिवादींनी दावा ब मिळकतीची मोजणी करण्यास मज्जाव केल्यामुळे शिराळा पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याचे कथन केले आहे. सदरची बाब वादीतर्फे निशाणी ३ सोबत दाखल करण्यात आलेल्या एन.सी.प्रत, तसेच तहसिलदार यांचेकडे दिलेल्या अर्जावरुन स्पष्ट होते.

२४. वादींनी जिल्हाधिकारी यांचे आदेशातील अटींचा भंग केलेला असल्यामुळे जागा मंजुरीचा आदेश आपोआपच रद्द झाल्याचे प्रतिवादींनी कथन केले आहे. वादींनी नि.क्र. ३ सोबत सदर आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. त्या आदेशाचे अवलोकन करता अट नं. ९ अशी आहे की, उक्त जागा मंजूर केल्यापासून दोन वर्षांचे आत त्यावरील कार्यालयीन इमारतीचे बांधकाम केले पाहिजे यात कसूर झाल्यास कब्जे हक्काच्या रक्कमेइतकी नुकसान भरपाईची रक्कम वसूल करुन जागा सरकार जमा करण्यात येईल. तसेच अट नं. १८ अशी आहे की, वरील पैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास प्रस्तुतचा जागा मंजुरीचा आदेश रद्द करण्यात येईल. वादींनी निशाणी ३ सोबत प्रतिवादींनी जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे दि. १८/०७/२०२२ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे.

सदर अर्जामध्ये त्यांनी जिल्हाधिकारी यांचे आदेशाचा वादींनी भंग केला म्हणून जागा मंजूरी आदेश रद्द व्हावा अशी विनंती केली आहे. सदर अर्जाचे चौकशीकामी प्रतिवादी नं. १ व वादींना दिनांक १०/०७/२०२३ रोजी हजर राहण्याबाबत तहसिलदारांमार्फत देण्यात आलेली नोटीस प्रतिवादींनी नि.क्र. २७ सोबत दाखल केली आहे. यावरुन चौकशीचे काम सुरु झाल्याचे स्पष्ट होते. मात्र प्रस्तुतचा आदेश रद्द झाला असल्याबाबत कोणतेही कागदपत्र समोर आलेले नाही. वादींनी सदर आदेशाचा भंग केला असे जरी म्हटले तरी देखील सदर जागा मंजुरी आदेश रद्द झाला असे म्हणता येणार नाही.

२५. उपरोक्त चर्चेवरुन तसेच दाखल कागदपत्रावरुन सि.स.नं. ८५१ पैकी ४५० चौ. मी. क्षेत्र म्हणजेच दावा ब मिळकत ही जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार वादींचे मालकीचे असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. वादींनी तहसिलदार शिराळा यांच्याकडे दिलेला अर्ज, उपअधिक्षक भूमि अभिलेख शिराळा यांनी वादीस मोजणीबाबत फी भरणेचा दिलेला आदेश, मोजणी नोटीस, वादींनी प्रतिवादींच्या विरुध्द दिलेली एन.सी.प्रत, तहसिलदार शिराळा यांच्याकडे दिलेला तक्रारी अर्ज तसेच प्रतिवादी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दि. १८/०७/२०२२ रोजी दिलेला अर्ज यावरुन वादींची दावा मिळकत ब मध्ये कब्जे वहिवाट असल्याचे व त्यास प्रतिवादीनी हरकत अडथळा केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे वादींच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे. दाव्याचा समतोल देखील वादींच्या बाजूने आहे. प्रतिवादींस तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार नाही. तसेच प्रस्तुत दाव्याचे कामी गुंतागुंत

निर्माण होणार आहे. वरील संपूर्ण कारणमीमांसेचा विचार करता वादींचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करिता मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ४ करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

आदेश

१. वादींचा नि.क्र. ५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी स्वतः अगर इतरांमार्फत वादींचे दावा ब मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस दाव्याचा अंतीम निकाल होईपर्यंत हरकत अडथळा करु नये व वादींना दावा मिळकतीतून बेदखल करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींविरुध्द देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-

शिराळा (व्ही. ए. देसाई)
दिनांक ०३/११/२०२३ **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.**

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer	:	V. S. Patil
Court	:	Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala
Date	:	03/11/2023
Judgment signed by the Presiding Officer on	:	03/11/2023
Judgment uploaded on	:	06/11/2023